सकाळ



वडारवाडी : गोलंदाज चौकात पथनाट्य सादर करण्यात आले.

# वडारवाडीत सायबर सेलबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती

**गोखलेनगर** : पुणे शहर पोलिस, क्विकहिल फाउंडेशन आणि पंख संस्थेच्या वतीने वडारवाडी येथील गोलंदाज चौकात पथनाट्याद्वारे सायबर सेल, भरोसा सेल याविषयी जनजागृती करण्यात आली. आजच्या डिजिटल युगात सायबर संबंधित गुन्हे झपाट्याने वाढत आहेत. त्यामुळे तळागाळात जनजागृती करण्यासाठी पुणे पोलिस आयुक्त के व्यंकटेशम यांच्या मार्गदर्शनाखाली १२ जुलैपर्यंत शहरात विविध ठिकाणी पथनाट्य सादर केली जाणार आहेत. याच्या उद्‌घाटनप्रसंगी सहायक पोलिस आयुक्त देविदास पाटील (खडकी विभाग), वरिष्ठ पोलिस निरीक्षक भास्कर जाधव, सेवानिवृत्त वरिष्ठ पोलिस निरीक्षक दयानंद ढोमे, पंख संस्थेच्या अध्यक्षा स्मिता आपटे, क्विकहिल फाउंडेशनचे कैलास काटकर, पोलिस उपनिरीक्षक किरण मदने, अग्निशामक दलाचे प्रमोद एकबोटे, सचिन करणझूले, मृणाल महापूसकर, हवलदार पिंगळे यांसह वडारवाडीतील नागरिक उपस्थित होते.